## प्रकरण दुसरे

# दलित कादंबरी आणि 'शूद्र'

- प्रस्तावना

१. समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी नायिका – 'सूड'

२. विस्कटलेल्या दलितांना सावरण्याचा प्रयत्न – 'इस्कोट'

३. हिंदू संस्कृती व अंधश्रद्धेने चिरडलेला – 'नकुल'

४. संस्कृतीचे मूळ शोधणारी 'युगविधान'

५. पुराणकाळापासून मानवाचा अस्तित्वशोधाचा प्रयत्न – 'हकिकत व जटायू'

६. अस्पृश्यतेचा डाग पुसून टाकण्याची धडपड 'शूद्र'

७. 'शूद्र' चे कथानक

८. निष्कर्ष

- संदर्भसूची

# प्रकरण दुसरे

## दलित कादंबरी आणि 'शूद्र'

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी वाङ्मयामध्ये अतिशय वैशिष्ट्यपूर्ण बदल घडून आले. नवीन पिढी नव्या उमेदीने, नव्या जोमाने लिखाण करू लागली होती. असे होत असतानाच मराठी वाङ्मयामध्ये मात्र एक विशिष्ट साचा, अभिव्यक्तीची एक बंदिस्त चौकट तयार व्हायला लागली होती. मराठी साहित्य हे मध्यमवर्गीय समाजाच्या वर्तुळातच गुरफटते की काय ? अशी अवस्था दरम्यानच्या कालखंडात निर्माण झाली होती. परंतु दुसरे महायुद्ध, देशाला मिळालेले स्वातंत्र्य, वैज्ञानिक प्रगती, परिवर्तन, पाश्चिमात्य विचार या सर्वांमुळे जीवनाकडे बघण्याचा एकूण दृष्टिकोनच बदलला. मानवी संस्कृती दिखाऊ व फोल ठरू लागली. याची जाणीव विचारवंत, सुजाण नागरिक, कलावंत, लेखक यांना होऊ लागली. जीवनातील विफलता, नैराश्य, अस्तित्ववाद, परात्मता, तुच्छता या सर्वांचा प्रभाव आणि परिणाम मराठी साहित्यावर होणे अपरिहार्य होते. यातूनच पुढे ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य, जानपद साहित्य, आदिवासी साहित्य, दलित साहित्य इ. वेगवेगळे साहित्यप्रवाह निर्माण झाले.

हा सर्व बदल होत असतानाच 'दलित साहित्य' अत्यंत वेगाने आणि उर्मीने आपला आविष्कार समृद्ध करत होते. दलित लेखक दलितांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराची मीमांसा करू लागला होता. दलित लेखकाने लिहिलेल्या साहित्यामध्ये काव्य, आत्मकथन, कथात्मक साहित्य हे एकूण दलित साहित्याचे महत्त्वपूर्ण अंग बनले होते तर कादंबरी, नाटक, समीक्षा मोजक्या प्रमाणातच अभिव्यक्त होत होती.

ज्या समाजाला आपले अस्तित्वच ठाऊक नव्हते, ज्याला मोकळा श्वास घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते, पिढ्यानपिढ्या तो सामाजिक, आर्थिक, जातीय अन्याय सहन करीत होता. तो समाज स्वातंत्र्योत्तर काळात नुकताच याविरुद्ध बोलू आणि लिहू लागला होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आत्मभान यासारख्या जीवनमूल्यांचा स्पर्श त्याच्या मनाला आत्मविश्वासाचे नवे पंख, नवे बळ देत होता.

प्रस्तुत प्रकरणात मराठी दलित साहित्यातील कादंबरी वाङ्मयाच्या सहाय्याने दलित कादंबरीचा विकास आणि या कादंबऱ्यातील महत्त्वाच्या साहित्यकृतींचा परामर्श घ्यावयाचा आहे. दलित कादंबऱ्यांमधील काही विशेष साहित्यकृतींच्याधारे सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीचे वेगळेपण स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. १९६० नंतर दलित समाजातील लोकांना शिक्षण, संस्कृती, सभ्यता, कला यांचा लाभ मिळू लागला व त्यातूनच त्याचे वैचारिक मंथन घडून येऊ लागले. दलितांना शासनाच्या धोरणांमुळे महाविद्यालयीन शिक्षण मिळू लागले होते. बहुजन समाजातील मुले पांढरपेश्यांच्या मुलांप्रमाणे शिकू लागली होती. परंतु जातीय आणि वर्ण विषमतेचा लहानपणीचा व शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंतचा आलेला विदारक अनुभव त्यांना अस्वस्थ करू लागला व त्यातूनच दलित कादंबरीची जडणघडण होऊ लागली.

मराठी कादंबरीच्या बदलत्या आशयविषय-अभिव्यक्तिच्या रूपांचा शोध घेत असतानाच दलित समाजातून पुढे आलेला संवेदनाक्षम मनाचा माणूस आतापर्यंतच्या बेगडी वातावरणामध्ये सिद्ध झालेल्या कादंबरी वाङ्मयामध्ये त्याचे सत्यचित्र कुठेच नाही हे पाहून आश्चर्यचकित तर झालाच, शिवाय अस्वस्थही झाला होता. आपले

जीवन कादंबरीमय व्हायलाच हवे याची तीव्र जाणीव त्याला झाली. या जाणिवेतूनच दलित कादंबरी उदयाला आली असे म्हणता येईल.

या प्रकरणात दलित कादंबरी वाङ्मयातील काही विशेष कादंबऱ्यांच्या आधारे सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीचे वेगळेपण सांगता येईल. खरं तर दलित कादंबरी ही परंपरेतून निर्माण झालेली कादंबरी नाही तर ती प्रयोजनातून निर्माण झालेली कादंबरी आहे. 'शूद्र' चा सर्वांगीण अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने दिसून येते ती ही की, या कादंबरीचे कथानक हे पुराणाकथांच्या पार्श्वभूमीवर समृद्ध होताना दिसते. हिंदूंच्या पुराण साहित्यात देवदेवता, ऋषी, साधुसंत, कर्मकांड, देवतांचे महत्त्व इत्यादीविषयी अनेक कथा आढळतात. रामायण आणि महाभारत हे आपले धार्मिक ग्रंथ मानले जातात आणि ते चिंतनाचा विषय बनू शकतात. यातील कल्पना, प्रतीक, प्रतिमा यांना वेगळे रूप देण्याचा प्रयत्न दलित कादंबरीकार करतात. 'शूद्र'[१] मध्येही असेच एक पुराण काळातील कथानक घेऊन लेखकाने आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने त्याला वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला आहे. आणि म्हणूनच 'शूद्र' ही कादंबरी वाचकाला अंतर्बाह्य हादरवून सोडते.

'शूद्र' च्या अनुषंगाने इतर काही दलित कादंबऱ्यांचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे, ज्यामुळे त्या सर्व कादंबऱ्या व 'शूद्र' यामधील साम्यभेद स्पष्ट होतील.

## १. समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी नायिका - 'सूड'

पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असते. सुशिक्षित, सुसंस्कृत घरात आजही स्त्रीचे शोषण होते. दलित स्त्रीची अवस्था तर याहूनही भयावह आहे.

तिच्या समाजातील लोकांकडून आणि प्रस्थापित समाजाकडूनही तिचे शोषण होते. तरीही ती आपल्या कुटुंबासाठी कष्ट उपसत असते. दलित स्त्रीची नानाविध आगळीवेगळी रूपे दलित कादंबऱ्यांमध्ये प्रकर्षाने प्रत्ययास येतात. कधी कुटुंबवत्सल, तर कधी आक्रमक, कधी परिस्थितीला शरण जाणारी तर कधी परंपरेला छेद देऊन स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करणारी, कधी प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती यांना लाथाडणारी, तर कशी वेश्याव्यवसायासारख्या भयानक जाळ्यातून स्वत:ची सुटका करून स्वत:त परिवर्तन घडवून आणणारी अशी तिची विविध रूपे आहेत.

'सूड'[२] ही बाबुराव बागुल यांची कादंबरी आहे. ह्यातून प्रामुख्याने स्त्रीसमस्या मांडली आहे. 'सूड' या कादंबरीची नायिका जानकी ही दलित समाजातील स्त्री आहे. जानकीला मुळात 'स्त्री' म्हणून जगायचेच नसते, तर पुरुष होऊन जगायचे असते. एक मूलभूत परिवर्तन तिला हवे असते. याची कथा 'सूड' या कादंबरीमध्ये कमीत कमी मजकुरामध्ये लेखकाने मांडली आहे.

जानकी ही अतिशय सुंदर, सुरेख व देखणी मुलगी असते. पण वयात येताच तिच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचारामुळे तिच्या स्त्रीदेहाचे खूपच हाल होतात. आणि त्यामुळेच तिला आपल्या स्त्रीत्वाची घृणा वाटू लागते. आपण आपले अस्तित्वच नष्ट करून या सगळ्या जीवघेण्या प्रसंगातून मुक्तता स्वीकारावी यासाठी ती आपल्या स्त्रीत्वाचाच त्याग करते - आणि ताबडतोब ती मोठ्या युक्तीने वेश्यागृहातून बाहेर पडते. अगदी सुरवातीला तिला खूपच वाईट अनुभव येतात. ती एक अबला स्त्री आहे असे समजून तिच्याकडे वासनायुक्त भावनेनेच लोक बघतात. तिला त्रास देतात. शेवटी मात्र तिची स्वामीजींशी गाठ पडते. त्यांना पाहताच तिचे

चित्त शांत होते. त्यांच्या स्वभावाचा परिचय झाल्यावर त्यांच्याबरोबर तीर्थयात्रा करू लागते. हळूहळू जानकीच्या मनात बदल व्हायला लागतात. ती इतकी बदलते की शेवटी तिच्या मनात असलेली स्त्रीत्वाबद्दलची घृणा, कामेच्छेविषयीचा क्रोध, तिरस्कार नष्ट होतात.

बाबुराव बागुलांनी या कादंबरीच्या माध्यमातून स्त्री-पुरुषसंबंधाबद्दलच्या सनातन प्रश्नाला हात घातला आहे. स्त्री ही उपभोग्य वस्तू आणि वासनापूर्तीसाठीच असते अशीच पुरुषप्रधान संस्कृतीची धारणा असते. पण बागुलांनी या कथानकातून अनंत अनादी काळापासून चालत आलेल्या धारणेवर जबरदस्त प्रहार केला आहे. ज्या धर्माने, संस्कृतीने स्त्रीला अबला ठरविले, उपभोग्य वस्तू ठरविले, ज्या देवाच्या अस्तित्वाने या सगळ्या गोष्टींना सम्मती दिली, ज्या समाजाने तिला मुरळीची मुलगी ठरविली, तिची विटंबना उघड्या डोळ्यांनी पाहिली त्या सर्वांविरुद्ध विद्रोहाची, संतापाची, भाषा जानकी नेहमी वापरते. कधी कधी तर ती चवताळून उठते. जानकीच्या आयुष्यात शरीरसंभोगाला अत्यंत ओंगळ, किळसवाणे, बीभत्स, शिसारी आणणारे स्वरूप आले आहे. संभोग हा केवळ बलात्कारच आहे अशी तिची धारणा झालेली आहे. एक स्त्री म्हणून समाजातील स्त्रीदु:खाचा तो आविष्कार आहे. त्यामुळे जानकी ही दलित असली तरी ती मूलत: एक स्त्री आहे. स्त्रीवर्गाचे प्रातिनिधिक रूप म्हणजे जानकी होय.

बाबुराव बागुल यांनी समाजव्यवस्था आणि संस्कृती यांच्या संचिताची विकृती 'सूड' या कादंबरीतून जानकीच्या जीवनातून व्यक्त केली आहे. अत्यंत कलात्मक आणि कल्पकरित्या संयमाने चित्र उभे केल्याने ही दीर्घ कथात्मक कादंबरी महत्त्वाची ठरते.

## २. विस्कटलेल्या दलितांना सावरण्याचा प्रयत्न - 'इस्फोट'

भीमसेन देठे यांची 'इस्फोट' ही पहिलीच कादंबरी होय. या कादंबरीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतराने बहुजन समाजात जागृत झालेली अस्मिता मांडण्याचा एक चांगला प्रयत्न केला आहे. १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी प्रथम स्वत: बौद्ध धर्म स्वीकारला. त्यानंतर अनेक दलितांनी, अस्पृश्यांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. या घटनेचे पडसाद, अनेक गावांमध्ये उमटले. गावातील प्रत्येकांनी आपआपल्या वस्त्यातून बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. पूर्वापार चालत आलेली कामे सोडून दिल्यानंतर सवर्णांनी या बौद्धांची काय अवस्था केली? याचे चित्रण 'इस्फोट'[३] या कादंबरीमध्ये भीमसेन देठे यांनी केले आहे.

पुणे-नाशिक रोडवरील 'वडगांव' मध्ये घडलेली कथा. १९५६ साली नागपूर मुक्कामी हजारो वर्षांच्या अंधाराला मूठमाती देऊन डॉ. आंबेडकरांनी प्रथम स्वत: बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याचे पडसाद वडगावलाही उमटले. बौद्धांनी गावकीची कामे सोडली. त्यामुळे गावकरी मंडळी, पाटील, सरपंच, कुलकर्णी, तलाठी भडकतात व त्यातून पुढे गावकरी व बौद्ध यांच्यात जो संघर्ष उभा राहतो तो येथे 'इस्फोट' मध्ये यथार्थपणे उभा केलेला आहे.

'मधू' हा सुशिक्षित बौद्ध पदवीधर, लहानपणापासून शाळेत अतिशय हुशार होता. त्यामुळे सातवी, मॅट्रिक व कॉलेजातही सतत वरच्या श्रेणीतून उत्तीर्ण होणारा. वडील तमासगीर, आई 'सखू' गावच्या ग्रामपंचायतीत झाडूवालीचे काम करणारी. वडगावात भोसले गुरुजी नवमतवादी, बौद्धांना व मधुला मार्गदर्शन करणारे, शाळेत त्याच्या हुशारीने दिलीप कुलकर्णी, निवृत्ती बेंडे, अशोक शेळके मधुचे मित्र बनतात.

आप्पा कुलकर्णी (दिलीपचे वडील) गावातील बडी आसामी. त्यांना दिलीप व मेघा ही दोन मुलं. दिलीपच्या बंगल्यावर मधुच्या अभ्यासास येण्याजाण्याने मधू व मेघाचे प्रेम जमते. त्यामुळे आप्पा कुलकर्णी भडकतात व मधुचा अपमान करून त्याला हाकलून देतात. मॅट्रिकनंतर मधू मुंबईस सिद्धार्थ कॉलेजात शिक्षणास जातो. योगायोगाने मेघाही याच कॉलेजात त्याला भेटते.

एके दिवशी दोघेही अनोख्या सुखाची गोडी लुटतात. मनाने व शरीराने एकत्र येऊन तृप्त होतात. अर्थातच मेघाला डोहाळे लागतात. त्यामुळे मावशी-काकांना समजेल म्हणून ती मधुकडे जाते. मधू तिचा स्वीकार करतो व तिच्याशी बौद्ध पद्धतीने विवाह करतो. मेघाच्या या कृत्यामुळे आप्पा पेटलेले असतात. सुडाने भरलेले आप्पा मधु व त्याच्या पुऱ्या बौद्ध वस्तीला नाश करण्याची प्रतिज्ञा करून वडगावला परत येतात. मधू-मेघा व त्यांचे लहान बाळ घेऊन कचऱ्या (मधुचा मित्र) वडगावात उतरताच सगळे गाव बिथरले व त्याच रात्री बौद्ध वस्ती पेटविली जाते. त्यात वस्तीबरोबर मधू, मेघा, सविता व मधुचा बापही राखेत विलीन होतात. सारी आग शांत होते.

शिल्लक राहतो दोघांच्या मीलनातून उपजलेला अंकूर - बाळ.

मनाचा ठाव घेणारी अशी ही कादंबरी वाचल्यावर भीमसेन देठेंच्या विचारांची बैठक किती सामर्थ्यशाली आहे याची कल्पना येते. या कादंबरीचे मुख्य श्रेय त्याचे संगलन करणाऱ्या भीमसेन देठेंकडे जाते. स्वत:च्या आवडी-निवडी बरोबरच सध्याच्या बौद्ध पिढीला जे आज हवे आहे त्याचे भान ठेवून लिखाण झाले आहे, त्यामुळे त्यांची त्यामागची भावना अधिक महत्त्वाची वाटते.

जग कितीही बदलले तरी मानवी संकुचित वृत्ती, एकविसाव्या शतकातही बदलणार नाही. याचा मात्र विस्फोट भीमसेन देठे यांनी 'इस्फोट' या कादंबरीतून केला आहे. या कादंबरीचा मूलभूत गाभा संघर्ष आहे. या कादंबरीला धर्मांतराची पूर्वीपीठिका लाभली आहे. धर्मांतरानंतरच्या बदललेल्या दलित समाजाचा एक आत्मविश्वास आणि दलित कादंबरीचा उंचावलेला दर्जा व्यक्त करणारी 'इस्फोट' ही वैशिष्ट्यपूर्ण आणि दखलपात्र अशी कादंबरी आहे.

## ३. हिंदू संस्कृती व अंधश्रद्धेने चिरडलेला - नकुल

'नकुल'[४] ही माधव कसबे यांची पहिलीच कादंबरी. या कादंबरीची सामाजिकता पानोपानी वाचकाच्या मनावर ठसली तर त्यात आश्चर्य वाटत नाही. कथानकाच्या कालावधीतील सगळ्या सामाजिक स्थित्यंतराचा पाढा चुकू नये याची दक्षता माधव कसबे यांनी घेतली असून जुन्या नव्या पिढ्यांच्या दृष्टिकोनातून जाणवलेला फरक जागोजागी स्पष्ट केला आहे. या सर्व समस्यांना स्पर्श करावयाचा असल्यामुळे लेखकाने नायक-नायिकांना बरेचसे प्रातिनिधिक स्वरूप दिलेले आहे.

पूर्वीच्या महार जातीतील विधवा राधा व मराठा समाजातील गावचा पुढारी आबा जाधव यांच्या प्रेमसंबंधातून झालेल्या अनैतिक मुलांची; म्हणजेच अर्जुन, मंडी व तिसरा नकुल यांची ही कथा आहे. आबा जाधव गावातील एक प्रतिष्ठित तालेवार माणूस. संपत्तीच्या जोरावर मानमराबत, लौकिक मिळविलेला एक मराठा गडी. दिवसा रगेल व रात्री रंगेल अशा वृत्तीचा तो आहे. तो कट्टर जातीयवादी, अस्पृश्यांचा विरोधक व रूढीप्रिय आहे. दरम्यान राधा आपल्या नवऱ्यासह माहेरी येते. नवरा आजारी, बाप गरीब, अशा परिस्थितीत ती मोलमजुरी करून पोट भरते.

मजुरीच्या शोधात ती एकदा आबाकडे शेतीच्या कामासाठी येते. पुढे ओळख वाढते व त्याचे रूपांतर प्रेमात होते. त्यानंतर काही दिवसांनी राधाचा नवरा मृत्यू पावतो. वडीलही मरतात. पोरकी, अनाथ झालेली राधा नाईलाजाने का होईना पण आबाकडे ओढली जाते. त्यातूनच तिला तीन मुले होतात. जातीयवादी व प्रचंड हिशेबी आबा राधावर कितीही प्रेम असले तरी तिच्याकडे तो काहीही खात नाही. परंतु शय्यासोबत करण्यासाठी मात्र त्याला राधाच प्रिय असते.

राधाचा मोठा मुलगा अर्जुन शाळामास्तर असतो. दुसरा मुलगा मंडी लग्न झालेला तर तिसरा नकुल हुशार, देखणा असतो. मॅट्रीकनंतर आबा नकुलला 'नकुल भुजंगराव जाधव' या स्वतःच्या नावाने कॉलेजात घालतो. पुढे परिवर्तनाची लाट नकुलपर्यंत येऊन पोहचते. नकुल बौद्ध धर्म स्वीकारतो. बौद्धांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचा प्रतिकार करण्यासाठी नकुल सदैव तत्पर असतो. आबाला ही गोष्ट पटत नाही. त्यामुळे त्यांच्यात मतभेद निर्माण होतात. नवबौद्धांच्या हक्काची जमीन सवर्ण ग्राम विकासाच्या नावाखाली हडपायचा प्रयत्न करतात. यातूनच नवबौद्ध व सवर्ण यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

या सर्व प्रकरणात नकुल हाच नवबौद्धांच्या नेतृत्वाची धुरा सांभाळत होता. नवबौद्धांच्या अडीअडचणींना सोडवत होता. पुढे नकुल आबाच्या भाचीच्या म्हणजे विमलच्या प्रेमात पडतो. ही गोष्ट आबाला खटकते. तो या दोघांच्या आड येत असतो. एका बिकट प्रसंगातून रक्तबंबाळ होऊनही नकुल आबाला वाचवतो. नकुलचे धाडस पाहून आबा नकुलला बंदूक चालविण्याचे शिक्षण देतो. पण तरीही आबा नकुल आणि विमलच्या प्रेमाला मान्यता देत नाही. संघर्ष अधिकच वाढतो. आणि त्यातच दोघांचा शेवट होतो.

जातीयता या दलितांच्या समस्येवर लेखकाने लक्ष केंद्रित केले आहे. त्याबरोबरच दलितांच्या अडचणीच्या परिस्थितीचा फायदा कसा घेतला जातो याचे चित्रण लेखकाने केले आहे. दोन पिढीतील विचारांची भिन्नता शब्दबद्ध करून डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान नवतरूणात कसा बदल घडवून आणते याचे प्रत्यंतर केवळ कलेच्या अंगाने करण्यापेक्षा माधव कसबे वास्तववादी भूमिकेतून अधिक चांगल्या प्रकारे करतात.

या कादंबरीबाबत मोहन वाघमारे म्हणतात, " समतेच्या तत्त्वज्ञानाचा शील-प्रज्ञा-करूणा यांचा प्रभाव या पिढीवर किती जबरदस्त आहे हे नकुलच्या रूपानं सांगता येईल. विमल सर्वस्व अर्पण करायला तयार असताना अधाशाप्रमाणे ते सुख न उपभोगता, बुद्धिप्रामाण्याने मतपरिवर्तन करून जुन्या पिढीवर नवीन विचारांचा पगडा बसवून मिलनाची अपेक्षा करणारा विचार या ठिकाणी मांडला आहे."[५] इतका प्रचंड प्रभाव दलितांवर झालेला आहे. याचे एक चांगले उदाहरण देण्याचा प्रयत्न माधव कसबे यांनी 'नकुल' या कादंबरीमध्ये केला आहे.

## ४. संस्कृतीचे मूळ शोधणारी - युगविधान

दलित साहित्यात एक नवी आशा पल्लवीत करण्याचे काम 'युगविधान' सारखी कादंबरी करते. कादंबरीचा विषय, तिची मांडणी, व्यक्तिरेखा, कथानक आणि वातावरण या सगळ्या दृष्टीने ही कादंबरी वेगळी ठरते. ही कादंबरी एका विशिष्ट कुटुंबाची, एका नायकाची किंवा एका व्यक्तीवर अवलंबून असणारी नाही.

महाराष्ट्रात समाजप्रबोधनाची पहिली प्रक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात सुरू झाली. बहुजन समाज, पांढरपेशी मध्यमवर्गीय समाज यांच्यात ती सुरू झाली.

दलित समाजात तेव्हापासूनच परिवर्तन होऊ लागले. या सर्व परिवर्तनाचा ऐतिहासिक आढावा या कादंबरीमध्ये घेतला आहे. या परिवर्तनाचे तीन टप्पे केले आहे.

१८८७ ते १९२७ – पहिला टप्पा.

१९२७ ते १९५६ – दुसरा टप्पा

१९५६ ते १९७० – तिसरा टप्पा

वर्णव्यवस्थेत भरडला, पिचला गेलेला हा दलित समाज दुष्काळ आणि प्लेग यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्येही अधिकच होरपळून गेला. जेव्हापासून महाडच्या चवदार तळ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्णवर्चस्वाविरुद्ध रणशिंग फुंकले तेव्हापर्यंत कथारूप इतिहास या कादंबरीत आहे हा पहिला टप्पा आहे. तर १९२७ च्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून ते १९५६ साली झालेल्या धर्मांतराच्याघटनेपर्यंतचा प्रवास हा दुसरा टप्पा आहे. १९५६ नंतर धर्मांतराने केलेल्या दलितांच्या मानसिक परिवर्तनाचे चित्रण हा तिसरा टप्पा आहे.

अनेक व्यक्तींनी मिळून बनलेली ही कादंबरी आहे. अनेक व्यक्तींच्या जीवनानुभवातून आणि जीवनमरणाच्या संघर्षातून त्या युगासंबंधीचे एक वास्तवदर्शन ही कादंबरी करते. या वास्तव दर्शनात जोशी आणि त्याच्या सात भाच्यांची कहाणी या कादंबरीत आहे. गोविंद-गोपाळ या भावांची एह हृदयकथा तर लक्ष्मण व भागू यांच्या प्रेमजीवनाची दारूण शोकांतिकाही या कादंबरीत आहे. तीन पिढ्यांनी गजबजलेल्या माणसांची कथा या कादंबरीत आहे. ही कादंबरी केवळ व्यक्तिकेंद्री नसून ती समाजकेंद्री आहे.

सवर्ण विरुद्ध अस्पृश्य, जमीनदार खोत विरुद्ध अस्पृश्य, सरकारी अंमलदार विरुद्ध अस्पृश्य असे वेगवेगळ्या प्रकारचे आणि वेगवेगळ्या पातळीवरचे ताणतणाव या कादंबरीमध्ये बा. स. हाटे यांनी शब्दबद्ध केले आहेत. एकूण ३१ भागात लिहिलेली ही कादंबरी दलित समाजाच्या व्यक्तींच्या संघर्षाच्या कहाणीबरोबरच ती शोकनाट्याची जाणीवही करून देते.

दलित साहित्याच्या भाषिक संकेताला बळी न पडता बा. स. हाटे यांनी दलित वाङ्मयामध्ये 'युगविधान' ही कादंबरी लिहून मोलाची भर घातली आहे. ''मान ताठ ठेवून माणसाने माणसासारखं वागावं हेच आजचं युगविधान''[६] अशा शब्दांत त्यांनी कादंबरीच्या शीर्षकातील अन्वयार्थकता स्पष्ट केली आहे.

## ५. पुराणकाळापासून मानवाचा अस्तित्वशोधाचा प्रयत्न - 'हकिकत व जटायू'

मूलत: कवीचा आणि समीक्षकाचा पिंड असणाऱ्या केशव मेश्राम यांच्या प्रतिभेतून जन्मलेल्या 'हकिकत आणि जटायू' या दोन लघुकादंबऱ्या. त्यातील 'जटायू'[७] ही लघुकादंबरी मात्र एकसंधपणा, एकात्मता, एकजिनसीपणा या गुणानी निर्माण होते. 'जटायू' ही प्रतिकात्मक कथा आहे. 'जटायू' चे पंख छाटून त्याला घायाळ केले होते. पुराणकाळातील कथेचा धागा पकडून लेखकाने या कादंबरीतील नायक अभिमन याचा जीवनसंघर्ष मांडला आहे. अभिमन हादेखिल 'जटायू' प्रमाणे सर्व बाजूंनी घायाळ झाला आहे. शिक्षण, सुसंस्कारित असूनही तो काहीच करू शकत नाही. ही अभिमनची छोटीशी कथा एकात्म परिणाम साधताना दिसते.

अभिमन हा मांग जातीतील मुलगा शिक्षण घेऊन आपल्या घराचा आणि

कुटुंबाचा कायापालट करण्याचे स्वप्न बघतो. प्रत्यक्षात ते साकारही होते. परंतु नको त्या आरोपामध्ये तो अडकला जाऊन त्याची स्वप्ने भंग पावतात. या कादंबरीत दोन पिढ्यातील संघर्ष मांडला आहे. रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य आणि परंपरा यात रूतलेली जुनी पिढी आणि नव्या ज्ञानाचा स्पर्श झाल्याने नव्या जीवनाचे स्वप्न पाहणारे तरूण मन यातील रस्सीखेचीची एक करूण कहाणी 'जटायू' मध्ये मांडली आहे.

अभिमन हा सिद्धार्थनगरात जन्मलेला आणि वाढलेला मुलगा. शिक्षणाच्या योगाने अभिमनचे सुसंस्कृत व नव्या जीवनाकडे झेप घेणारे मन याचा एक आंतरिक ताण, अन्जाबाबा या दांभिक साधूची वागणूक, केवळ अस्पृश्य असल्याने झालेली पिळवणूक व अपमान, पत्नी सोनीकडून मिळालेली अनपेक्षित व धक्कादायक वागणूक, रमी नावाच्या बहिणीचा झालेला खून, बहिणीच्या खुनाचा त्याच्यावरच झालेला आरोप या सर्व घटनांतून अभिमन आणि पुराणकाळातील 'जटायू' ची अगतिकता या कादंबरीतील प्रत्येक प्रसंगातून निदर्शनास येते.

या कथानकाचा शेवटही नायकाबद्दल सहानुभूती आणि कारूण्याची भावना निर्माण करतो.

वरील सर्व कादंबऱ्या आणि 'शूद्र' चा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अत्यंत घनिष्ट संबंध आहे. 'सूड' मधील समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी जानकी आणि 'शूद्र' मधील नागनाथ एका मार्गाचे प्रवासी आहेत. 'इस्फोट' मधील मधू आणि 'शूद्र' मधील नागनाथ यांचा विस्कटलेल्या दलितांना, अस्पृशांना सावरण्याचा प्रयत्न तर अतिशय उच्चकोटीचा आहे. हिंदू संस्कृती आणि अंधश्रद्धेने चिरडलेले 'नकुल' आणि

'शूद्र' मधील कथानायक यांच्यात सामाजिक संघर्षाच्या पातळीवरचे संबंध अत्यंत घनिष्ट आहेत. संस्कृती संग्रामाचे मूळ शोधण्याचा 'युगविधान' आणि 'शूद्र' मधील प्रयत्न यांच्यात बरेचसे साम्य आपल्याला दिसून येते. पुराणकाळापासूनचा मानवाचा अस्तित्वशोधाचा प्रयत्न 'हकिकत आणि जटायू' व 'शूद्र' मधून स्पष्टपणे जाणवतो. अभिमन आणि नागनाथ हे पुराणकाळापासूनचे नायक या दोन्ही कादंबऱ्यांतून अगतिकतेच्या वादळात सापडलेले दिसतात.

## ६. अस्पृश्यतेचा डाग पुसून टाकणारी धडपड - 'शूद्र'

आदिम काळापासून चालत आलेला अस्पृश्यतेचा प्रश्न सुधाकर गायकवाड यांनी 'शूद्र' मधून मांडला आहे. आपल्या माथी असणारा अस्पृश्यतेचा डाग पुसून टाकण्यासाठी या कादंबरीचा नायक खूप प्रयत्न करतो. स्पृश्यास्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे असे कितीही म्हटले तरी बहुसंख्य उच्चवर्णीयांच्या मनात यत्किंचितही फरक पडत नाही. जातीय भेद दूर करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ते दूर होत नाहीत, हा धागा पकडून सुधाकर गायकवाड यांनी 'शूद्र' चे लेखन केले आहे.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे आपला समाज व त्यातील माणसे पिचली गेलेली आहेत. वेदनेला विद्रोहाची जोड असेल तरच क्रांती होते. म्हणूनच 'शूद्र' मधील नागनाथची भूमिकाही विद्रोहाची आहे. 'विद्रोह' आणि 'बुद्धपुरस्कृत मानवतावाद' या दरम्यान नागनाथची मानसिकता या कादंबरीत प्राण आणते. अस्पृश्यतेचा डाग पुसून टाकण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या नागनाथला यश येत नाही. तो असमर्थ ठरतो. यातूनच सुधाकर गायकवाड यांना हे सूचित करायचे आहे की, शूद्राशूद्र हा भेदभाव कधीही न संपणारा आहे. जोपर्यंत मानवी अस्तित्व टिकून राहील तोपर्यंत उच्च-नीच हा भेदभाव राहील. फार तर त्याचे रूप-स्वरूप वेगळे असेल.

## ७. 'शूद्र' चे कथानक

'शूद्र' हा डाग माथी घेऊन जन्माला आलेला तरूण म्हणजे नागनाथ. वडिलांवर झालेला अन्याय पाहून पेटून उठलेला नागनाथ प्रवासाला निघतो. या प्रवासात एक वृद्ध त्याला जंगलात गाठ पडतो. जन्मभर तो एकाच प्रश्नाचे उत्तर शोधतो. ''मी जन्माला आलो ते शूद्र म्हणून आणि कदाचित शूद्र म्हणूनच मरणार. ज्या दगडावर कावळ्या-कुत्र्याने विष्ठा टाकावी त्या क्षुल्लक दगडानेही आपला अवमान करावा, आपल्याला छळावे असे आयुष्य आपल्या वाटचाला का यावे ? ब्राह्मण-क्षत्रियांसारखाच आपला देह असताना केवळ शूद्र म्हणून प्राण्यासारखी सहज आपली हत्या का केली जावी ? आणि शूद्र म्हणूनच आपण का जन्माला यावे ? हेच प्रश्न घेऊन मी आयुष्यभर भटकत राहिलो. आता तू माझ्या श्वासाचा भेटलास, म्हणून रक्तात डसणारी ही व्यथा तुला सांगितली.''[८]

ही रक्तामध्ये डसणारी व्यथा म्हणजेच शूद्र, असा जो डाग जन्म:ताच चिकटलेला तो पुसून टाकण्याचे वचन नागनाथ त्या वृद्धास देतो. शूद्र म्हणून मरण्यापेक्षा जे आम्हाला शूद्र म्हणतात त्या ब्राह्मण-क्षत्रियांनी व्यापलेली भूमीच नष्ट करण्याची प्रतिज्ञा नागनाथ करतो. सर्व संसाराचा त्याग करून तो प्रवासास निघतो. वेंगयन राज्यात जाऊन सर्वांना ठार करण्याचे ठरवितो. चालता-चालता डोंगरावर पोहचल्यावर तो भेलकांडत खाली कोसळतो.

नागनाथ जेव्हा डोळे उघडतो तेव्हा एक सुंदर युवती त्याला दिसते. तो तिच्याकडे पाणी मागतो, तेव्हा तो केवळ शूद्र म्हणून ती त्याला पाणी द्यायचे की नाही याबाबत आपल्या वडिलांना विचारायला जाते. तेव्हा तिचे वडील म्हणतात, ''मुली, एक

वेळ तू तडफडत असलेल्या कुत्र्यास पाणी पाजलेस तर तुला मोठे पुण्य मिळेल. परंतु ज्याच्या अंगा-अंगावर पापांनी जखमा केल्या आहेत त्या शूद्राला पाणी पाजून तू आयुष्यातले एखादे पुण्य का कमी करून घेते आहेस ? आणि माहीत आहे तुला? शूद्राची तुझ्यावर किंचितशी सावली पडली तरी योद्धाने शत्रूचे शीर उडवावे त्याप्रमाणे माझी तपश्चर्या क्षणात निष्फळ होईल. म्हणून तू असले पापकर्म करू नकोस. उलट सेवकाला सांगून तू त्याला हाकलून दे.''[१]

''पाणी न मिळाल्यामुळे नागनाथचा स्वाभिमान डिवचला जावून त्याच्या सर्वांगाला विषारी दंश झाल्यासारखे वाटते. तो रागाने त्या युवतीच्या मुस्काटात मारतो. ती सुंदर युवती खाली कोसळते. तिचे लावण्य पाहून त्याच्या मनात वेगळे विचार येतात पण तो मनावर संयम ठेवतो. आपल्याला पोखरणारी अस्पृश्यत्वाची वेदना ही काय असते ? हे जर, तिला अनुभवण्यास मिळाले तर आपण धन्य होऊ, ही सूडाची भावना तो व्यक्त करतो. या सूडभावनेतूनच तो तिची चुंबने घेतो. पण एका अबलेवर सूड उगवून त्याच्या मनातील सल कमी होणार होती ? या एका कृत्याने त्याच्यावरील 'शूद्र' हा डाग पुसला जाणार होता ? खरं तर नागनाथ आपले ध्येय सरळ मार्गाने पूर्ण करण्यास अपयशी ठरणार याचेच हे सूचन होते. इथे त्याच्याकडून घडलेली कृती म्हणजे त्याच्यात असणाऱ्या कमीपणाचे लक्षण होय.

पुढे नागनाथला प्रवासात एक योगी गाठ पडतो. एका शूद्राला आपण तत्त्वज्ञान सांगितले म्हणून त्याला राग येतो. त्यानंतर पुढे एक वृद्ध स्त्री भेटते. ती उदास असते कारण तिच्या मुलाला बरे नसतानाही एका ब्राह्मणाने गाईंचा गोठा शेपारण्यासाठी बोलविले होते. मुलाची अवस्था पाहून ती म्हातारीच त्याला कामावर पाठवत नाही.

एक शूद्राने आपल्या शब्दाची अवहेलना केली याचा राग येऊन ब्राह्मण राजाकडे तक्रार करतो. राजा त्या वृद्धेच्या मुलास (अम्मास) ठार मारतो. म्हातारीचे दुःख ऐकून नागनाथ हादरतो.

त्यानंतर विसा त्याला येऊन सांगतो की, तू ऋषिकन्येला ठार करायला हवे होते. तिने राजाला जाऊन सांगितले की, एका शूद्राने माझे वडील व त्यांचे शिष्य यांची हत्या केली. ताबडतोब राजाचे सैन्य वस्तीत घुसले आणि त्यांनी सर्वांना ठार केले. वस्तीत एकही जिवंत श्वास उरलेला नाही.

या सर्व अस्थिर, अगतिक आणि उद्विग्नावस्थेत नागनाथला सब्बबुद्ध भिख्खू भेटतात. ते बौद्ध तत्त्वज्ञान त्यास समजावून सांगतात. नागनाथला बौद्धतत्त्वज्ञान चांगलेच रूचते पण अचानक भिख्खूंवर हल्ला होऊन ते मारले जातात. सब्बबुद्धाच्या उपदेशाने नागनाथ भिख्खूंच्या जथ्यात सामील होतो. इथे मात्र नागनाथ आपला 'शूद्र' नावाचा प्रश्न पूर्णतः विसरतो. पण एक ब्राह्मण त्याला ओळखतो आणि राजाला कळवितो. राजाचे सैन्य येऊन सर्व भिख्खूंची हत्या केली जाते. एकटा भिख्खू ब्रह्मानंद (नागनाथ) जिवंत राहतो. पुन्हा नागनाथ भिख्खूची वस्त्रे गुंडाळून ठेवून धनुष्यबाण हाती घेतो.नगरावर हल्ला करतो. रक्ताचे पाट वाहतात. नागनाथ बाण लागून घायाळ होतो.

शेवटी ऋषिकन्या त्याच्यासमोर येते. नागनाथ तिच्याकडे पाण्याची याचना करतो. पाणी न देता ती त्याच्या छातीत बाण खुपसते. अखेरच्या क्षणी तो पुन्हा तिच्याकडे पाणी मागतो. पूर्वापार चालत आलेला संघर्ष, भेदाभेद नष्ट करायला सांगतो, पण ऋषिकन्या निर्घृणपणे त्याच्या छातीत बाण खुपसते. त्याच्या रक्ताची

चिळकांडी तिच्या कपड्यांवर उडते. तो डाग तिला धुऊन काढायचा आहे. यासाठी ती काय करणार हे मात्र माहीत नाही.

एका अर्थाने लेखक या कादंबरीत भीषण व दारूण अपयश चितारतो. इथे 'शूद्र' हा डाग पुसण्यात नागनाथ जरी अपयशी ठरला असला तरी लेखकाला पुढे जाऊन असे सुखवायचे आहे की, ही लढाई आताच सुरू झाली आहे. एक दिवस असा येईल की नागनाथचा विजय आणि युवतीचा पराजय होईल. दलितांना, शूद्रांना न्याय मिळेल.

शूद्रांच्या मनात असणारा अन्याय, संघर्ष, दास्यत्व झुगारण्याची प्रचंड ताकद सुधाकर गायकवाड यांनी समर्थपणे व्यक्त केली आहे.

## ८. निष्कर्ष

१. मध्यमवर्गीय समाजाच्या वर्तुळात गुरफटलेल्या साहित्याला दलित साहित्याने नवी दिशा, नवे अनुभव, नवा विचारप्रवाह दिला.

२. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आत्मभान, आत्मशोध यासारख्या जीवनमूल्यांचा स्पर्श दलित साहित्याने करवून दिला.

३. दलित समाजातील मुले बहुजन समाजातील पांढरपेश्यांच्या मुलांप्रमाणे शिकू लागली. यादरम्यान जातीय आणि वर्णविषमतेचा लहानपणीचा व शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंतचा विदारक अनुभव त्यांना अस्वस्थ करू लागला. त्यातूनच दलित कादंबरीची जडणघडण होऊ लागली.

४. आपल्या जीवनातील विदारक अनुभव कादंबरीचा विषय होऊ शकतो या जाणिवेतून दलित लेखक नव्या उमेदीने लेखन करू लागले.

५. 'शूद्र' या कादंबरीचे कथानक हे पुराणकथांच्या पार्श्वभूमीवर समृद्ध होताना दिसते.

६. समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी 'सूड' मधील जानकी ही सर्व दलित आणि उपेक्षित स्त्रियांच्या दु:खाचे दर्शन घडविणारी व्यक्तिरेखा आहे.

७. 'इस्कोट' या कादंबरीतून नवबौद्धांच्या समस्यांना आणि दु:खांना वाचा फुटलेली दिसते.

८. हिंदू संस्कृतीने चिरडलेल्या 'नकुल' ची कथा पाहताना दलितांच्या अडचणींचा फायदा उच्चवर्णीय कसे घेतात, या समस्येमुळे दलित कसा उपेक्षित राहतो याचे चित्रण माधव कसबे यांच्या 'नकुल' मधून होते.

९. दलित समाजाचा आणि पर्यायाने दलित कादंबरीचा नायक हा कुणी एक व्यक्ती नसून स्वत: दलित समाजच आहे हे 'युगविधान' या बा. स. हाटे यांच्या कादंबरीतून जाणवते.

१०. पुराणकाळापासून मानवाचा अस्तित्वशोधाचा प्रयत्न आणि त्यातून येणारी अगतिकता, दुर्बलता आणि औदासीन्य याचे चित्र 'हकिकत आणि जटायू' मधून उभे राहते.

११. या सर्व दलित कादंबऱ्यांशी जवळचं नातं सांगणारी 'शूद्र' ही कादंबरी आहे. जन्मभर अस्पृश्यतेचा डाग पुसण्याची धडपड करणाऱ्या नागनाथच्या जीवनाची दुर्दशा 'शूद्र' ही कादंबरी रेखाटते.

१२. शूद्राशूद्र हा भेदभाव कधीही न संपणारा आहे. मानवी अस्तित्व जोपर्यंत टिकून राहील तोपर्यंत उच्चनीच हा भेदभाव राहील या भावनेने 'शूद्र' चे लिखाण झालेले दिसते.

## संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| १. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>द्वितीयावृत्ती - २००५ |
| २. | बाबुराव बागुल | 'सूड'<br>अभिनव प्रकाशन, मुंबई<br>प्रथमावृत्ती - १९७० |
| ३. | भीमसेन देठे | 'इस्फोट'<br>संबोधी प्रकाशन, गोरेगाव, मुंबई<br>प्रथमावृत्ती - २६ फेब्रुवारी १९८० |
| ४. | माधव कसबे | 'नकुल'<br>लोकसंघ प्रकाशन, मुंबई<br>प्रथमावृत्ती - २६ सप्टेंबर १९८१ |
| ५. | मोहन वाघमारे | ''आंबेडकरवादी साहित्य समीक्षा'<br>लुंबिनी प्रकाशन, मुंबई.<br>प्रथमावृत्ती - १४ एप्रिल २०००<br>पृष्ठ क्र. १३० |
| ६. | बा. स. हाटे | 'युगविधान'<br>संबोधी प्रकाशन, मुंबई,<br>प्रथमावृत्ती - १९८३<br>पृष्ठ क्र. १९४ |
| ७. | केशव मेश्राम | 'हकिकत आणि जटायू'<br>पी.पी.एच. बुक स्टॉल, मुंबई<br>प्रथमावृत्ती १९७२ |

| | | |
|---|---|---|
| ८. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र.६ |
| ९. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>(पृष्ठ क्र. ३२) |